वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.NO.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि.१४ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# अखेर दादांनी संग्राम जगतापला रोखले

## फारूक पटेल सह इतर मुस्लिम नेत्यांच्या मागणीची अजितदादांनी घेतली दखल


Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## आजच्या मेळाव्यात संग्राम जगताप राहिले गैरहजर

# कायदे में रहेंगे तो फायदे में रहेंगे





बीड , (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रसचे आ.संग्राम जगताप यांचा आजचा बीड दौरा रद्द झाला असून पक्षाध्यक्ष अजितदादा पवार यांनी त्यांना तातडीने मुंबईला बोलावून घेतले आहे. संग्राम जगताप यांच्या दौऱ्याला बीड शहरातूनच नव्हे तर जिल्हाभरातून विरोध केला जात होता. केवळ मुस्लीमच नव्हे तर इतर समाजातूनही अशा जातीयतेढ निर्माण करणाऱ्या संग्राम जगतापच्या सभेला परवानगी देऊ नये अशी मागणी होत होती. अखेर दादांनी संग्राम जगतापला बीडमध्ये येण्यापासून रोखले असून त्यांना तातडीने मुंबईला बोलावून घेतले आहे. वरळीतील पक्षाच्या बैठकीनंतर पक्षाध्यक्ष अजित पवार,प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि संग्राम जगताप यांची बैठक होण्याची शक्यता आहे.

## अजित पवारांनी संग्राम जगतापांना मुंबईत बोलावून दिली समज

बीड, (दिव्य न्युज):- फारूक पटेल, मोईन मास्टर, बरकत लाला,आश्फाक इनामदार, अलिम पटेल यांच्या मागणीची राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी गंभीररित्या दखल घेतली आणि संग्राम जगताप यांना तात्काळ मुंबईत बोलावून घेतले. संग्राम जगताप यांच्यामुळे राज्यभरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला होता. वारंवार मुस्लिम विरोधी वक्तव्य केल्याने अजितदादांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रतिमा मलीन होत होती. फारूक पटेल सह इतरांनी बीड शहर पोलीस ठाण्यामध्ये या मोर्चाला परवानगी देवू नये अशीही मागणी केली होती. त्या सोबतच बीड शहरात सलोखा परिषदेला ही परवानगी मागितली होती. आज बीड शहरात सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स येथे हिंदू जन आक्रोश मोर्चा आणि सभा होती पण या सभेला प्रमुख म्हणुन असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आ.संग्राम जगताप हे अनुउपस्थित राहिले. त्यामुळे शहरात तणावाची स्थिती निर्माण झाली होती. संग्राम जगतापच्या अनुउपस्थितीमध्ये काहीश्या प्रमाणात शितलता दिसून ▶▶ पान २ वर

## संग्राम जगतापच्या बेताल वक्तव्याविरुध्द ॲड.शफीकभाऊ आक्रमक

बीड,(दिव्य न्युज):- आ.संग्राम जगताप यांच्या बेताल आणि जातीय तेढ निर्माण करणाऱ्या वक्तव्याविरूध्द सर्व स्तरातून संताप व्यक्त होत आहे. त्यातच एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफीकभाऊ यांनी अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांची भेट घेऊन आज किंवा यापुढेही संग्राम जगतापांच्या कार्यक्रमांना परवानगी देऊ



नये अशी मागणी केली आहे. त्याचबरोबर 'कायदे में रहेंगे तो फायदे में रहेंगे' असा इशारा जगताप यांना देत ॲड. शफीकभाऊंनी जगतापच्या बेताल वक्तव्याविरूध्द कायद्याच्या कोणकोणत्या कलमानुसार त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल होऊ शकतो याची सर्व कायदेशिर माहिति अप्पर पोलीस अधिक्षक यांच्याकडे सादर केली आहे. अशा प्रकारणात पोलीस प्रशासन स्वत: ▶▶ पान २ वर

## पालकमंत्री अजित पवारांना आ.संदीप क्षीरसागरांकडून अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर

### मतदार संघातील विविध मागण्यांचे दिले पत्र

बीड , (दिव्य न्युज):- मागील काही दिवसांपूर्वी बीड मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्री मा.अजित पवार यांना आ.संदीप क्षीरसागरांनी भेट घेऊन अहवाल सादर केला.आ.संदीप क्षीरसागर यांनी दि.१४ (मंगळवार) रोजी राज्याचे ▶▶ पान २ वर



## सत्तर वर्षात झालं नाही ते ना.समीर काझींनी चार वर्षात करून दाखवले

### वक्फ बोर्डाने पुरग्रस्तांसाठी सीएम रिलिफ फंडला दिले २५ लाख

बीड, (दिव्य न्युज):-महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे एकेकाळी कर्मचाऱ्यांच्या पगारी देण्यासाठी पैसे नव्हते, मात्र आज त्याच वक्फ बोर्डाने माणूसकी दाखवत पुरग्रस्तांच्या मदतीसाठी धाव घेतली आहे. वक्फ बोर्डाने राज्यातील पुरग्रस्तांसाठी सीएम रिलीफ फंडला तब्बल २५ लाख रूपयांची मदत केली आहे. सदरील मदतीचा धनादेश मुख्यमं देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, अल्पसंख्यांक विकास मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी यांच्यासह वक्फचे अधिकारी उपस्थित होते. दरम्यान गेल्या सत्तर वर्षात जे झाले नाही ते ना.समीर काझींनी चार वर्षात करून दाखवले आहे. राज्य वक्फ बोर्डाचा चेहरा-मोहरा बदलत त्याला एक विकासाभिमूख रूप दिले



आहे. महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याने त्यांच्या मदतीसाठी राज्य वक्फ बोर्डाने पुढाकार घेत पुरग्रस्तांसाठी सीएम रिलीफ फंडला २५ लाख रूपयांचा धनादेश दिला आहे. या माध्यमातून ▶▶ पान २ वर

### पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसांत

एक लाखाची शिष्यवृत्ती अल्पसंख्यांक समाजातील गरीब विद्यार्थ्यांना राज्य वक्फ बोर्डाच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. पीएचडी करणाऱ्या अशा गरीब विद्यार्थ्यांनी वक्फ बोर्डाकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज केल्यास त्या विद्यार्थ्यास तीन दिवसांमध्ये एक लाख रूपयांच्या मदतीच्या शिष्यवृत्तीचा धनादेश दिला जाणार असल्याचे अध्यक्ष समीर काझी यांनी सांगितले.






## जि.प, न.प.निवडणुकीच्या याचिकांवर गुरूवारी सुनावणी

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची प्रभाग रचना तसेच आरक्षण त्याचप्रमाणे नगरपालिकांच्या प्रभाग रचना व आरक्षण आणि मतदार यादी संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. सोमवारी (दि.१३) सर्व याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्या. विभा, कंकणवाडी व न्या. हितेन वेनेगावकर यांच्या खंडपीठाने सर्व याचिकांवरील सुनावणी १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत तहकूब केली.

सर्वोच्च न्यायालयाने राहुल रमेश वाघ व इतर या प्रकरणांमध्ये १६ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे मुंबई, नागपूर व औरंगाबाद तसेच कोल्हापूर याठिकाणी जि.प. व पं.स. तसेच नगरपालिका व महानगरपालिका यांच्या निवडणुकांमधील प्रभाग रचना आरक्षण इत्यादी संदर्भात सादर झालेल्या याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग तसेच राज्य शासन यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्याकडे अर्ज करावा, न्यायमूर्तींनी त्यावर आदेश पारित करावा, असे निर्देश दिले होते.त्यानुसार राज्य शासनाने मुख्य न्यायमूर्ती यांचेकडे अर्ज सादर केला होता, सोमवारी सादर झालेल्या व सुनावणीस असलेल्या याचिकादरम्यान सर्व याचिकांची सुनावणी एकत्र घेणे बाबत मुख्य न्यायमूर्ती यांच्याकडे शासनाने अर्ज सादर केला असल्याचे मुख्य सरकारी वकील अमरजीत सिंह गिरासे यांनी खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच नव्याने सादर झालेल्यां याचिकांबाबत ही असाच अर्ज सादर करून योग्य ते आदेश प्राप्त करून घेण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

### राज्य शासनास खंडपीठाचे निर्देश

यापूर्वी यासंदर्भात काही याचिका सादर झाल्या असता २२ सप्टेंबर २०२५ रोजी औरंगाबाद खंडपीठाने आदेश पारित करून य्यम सर्व याचिका कोणत्या खंडपीठाकडे वर्ग करवियाच्या याविषयी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्याकडे राज्य शासनाने अर्ज सादर करावा, असे निर्देश दिले होते.

### राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट निष्ठेने लढणार, स्वाभिमानाने जिंकणार

## नेकनूर सर्कल मधून सय्यद साजेद अली बाबूभाई यांचा पं.स.ला विजयाचा निर्धार

नेकनूर , (दिव्य न्युज):- नुकतेच जाहीर झालेल्या बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या आरक्षणात नेकनूर सर्कल हे. ओपन महिला सर्वसाधारण महिलांसाठी खुले झाले आहे. या पार्श्वभूमीवर अनेक वर्षांपासून समाजकारण आणि स्थानिक राजकारणात सक्रिय भूमिका निभावणाऱ्या. सय्यद साजेद अली बाबुभाई यांनी नेकनूर पंचायत समिती सर्कलमधून निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. निष्ठेने लढणार, स्वाभिमानाने जिंकणार आणि लढेंगे और जितेंगे भी... या टॅगलाईनसह बाबुभाई यांनी निवडणुकीच्या रणांगणात उतरण्याची तयारी केली आहे. स्थानिक पातळीवर त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे आणि लोकसंपर्कामुळे त्यांना चांगला जनाधार मिळाल्याचे बोलले जात आहे. आगामी निवडणुकीत नेकनूर सर्कलमधील ही लढत विशेष लक्षवेधी ठरणार असून, सय्यद साजेद अली बाबू यांच्या उमेदवारीकडे. जनतेतून मोठ्या प्रमाणे मागणी होत आहे. राजकीय वर्तुळात उत्सुकतेने पाहिले जात आहे.



# केज येथील आंदोलनाला हिंसक वळण,तुफान राडा

## बसेसवर दगडफेक, प्रवाशांना दगड लागले, अनेक जण जखमी

बीड (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू असलेल्या रस्ता रोको आंदोलनाला हिंसक वळण लागले. महामंडळाच्या अनेक बस गाड्यांची तरुणांकडून तोडफोड करण्यात आली आहे. काही प्रवाशांना देखील दगड लागल्याने ते जखमी झाल्याची माहिती मिळत आहे.

बीडच्या केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे साठवण तलाव मंजूर करावा या मागणीसाठी रास्ता रोकोचे आंदोलन करण्यात येत होते. अहिल्यानगर-अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गावर गेल्या तीन तासाहून अधिक काळापासून आंदोलन सुरू असल्याने अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या होत्या. पोलिसांकडून आंदोलकांना आंदोलन थांबवण्यासाठी विनंती करण्यात आली. परंतु आंदोलक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.

पोलिसांनी मध्यस्थी करूनही आंदोलकांनी आक्रमक पवित्रा स्वीकारला. मागणी मान्य होत नसल्याने काही तरूण आक्रमक झाले होते. त्यांनी एसटी महामंडळाच्या बसेसवर दगडफेक केली. दगडफेकीत काही एसटी गाड्यांचे नुकसान झाले असून काही प्रवासी देखील जखमी झाले आहेत. प्रवाशांना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेत.दरम्यान, दगडफेकीनंतर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज केला. यावेळी आंदोलकांची पांगापाग झाली.

साठवण तलाव आणि इतर मागण्यांसाठी सलग बारा दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाची सरकार दाखल घेत नसल्याने संतप्त आंदोलक रस्त्यावर उतरले. केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पाच तासांपासून रस्ता रोको आंदोलन सुरू आहे. दरम्यान पाच तास उलटून गेल्या नंतरही कुठला तोडगा निघत नसल्याने अज्ञातांनी पाच बसेसवर दगडफेक करून नुकसान केले आहे. त्यामुळे दोन्ही महामार्गावरील वाहतूक पूर्णतः



विस्कळीत झाली असून महामार्गावर सुमारे तीन किमीच्या रांगा लागल्या आहेत.

धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान वतीने कोरडेवाडी येथे राजश्रीताई उमरे पाटील या बीड जिल्ह्यातील कोरडेवाडी तालुका केज येथे साठवण तलावाच्या साठी पाणी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र द्यावे. अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ५० हजार नुकसान भरपाई देण्यात यावी. ज्ञानराधा बँकेची स्थावर व जंगम मालमत्ता ताब्यात घेऊन त्याचा लिलाव करण्यात यावा. त्यातून मिळालेल्या उत्पन्नातून ठेवीदारांचे पैसे तातडीने परत करण्यात यावेत. शेतकरी कर्जमाफी करण्यात यावी. शैक्षिणिक फीस माफ करण्यात यावी. या त्यांच्या पाच प्रमुख मागण्या साठी दि. ३ ऑक्टोबर पासून कोरडेवाडी येथे आमरण उपोषणाला बसल्या आहेत.

आज त्यांच्या उपोषणाचा बारावा दिवस आहे. मात्र त्यांच्या उपोषणाची प्रशासनाने दखल घेतली नसल्याने दि. ८ ऑक्टोबर रोजी संतप्त आंदोलकांनी तहसील कार्यालया समोर पेट्रोल टाकून बैलगाडी पेटविली. तसेच दि. ११ ऑक्टोबर रोजी सुमारे शंभर आंदोलकांनी तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले. मात्र, त्याही नंतर सरकार आणि प्रशासनाचे लक्ष न दिल्यामुळे आज (दि. १४) धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आणि गांवकरी यांनी केज येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ कळंब चौकात रास्ता रोको आंदोलन केले आहे.

सकाळी ११ वाजता सुरू झालेले हे आंदोलन दुपारी ४:३० वाजून गेले तरी रस्ता रोको आंदोलन सुरू असल्याने बीड - अंबाजोगाई, केज- माजलगाव आणि केज- कळंब या महामार्गावरील वाहतूक खोळंबली असल्याने शहराच्या वाहनांच्या बाहेर लांबच लांब रांगा लागलेल्या आहेत. तर उभ्या असलेल्या पाच एसटी बसेसवर अज्ञातांनी दगडफेक करून आंदोलनाला हिंसक वळण लागले आहे.घटनाक्रम :- १) दि. ३ ऑक्टोबर २०२५ -- साठवण तलाव, ज्ञानाराधा बँकेच्या ठेवी, दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रु नुकसान भरपाई यासह विविध मागण्यासाठी कोरडेवाडी येथे सहा दिवसा पासून उपोषण सुरू २) दि. ८ ऑक्टोबर २०२५ - संतप्त आंदोलकांनी तहसील कार्यालया समोर पेट्रोल टाकून बैलगाडी पेटविली. ३) दि. ११ ऑक्टोबर - सुमारे शंभर आंदोलकांनी तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले. ४) दि. ११ ऑक्टोबर :- सकाळी ११:०० वाजे पासून केज येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रस्ता रोको आंदोलन सुरू आहे. त्यानंतर आंदोलनाला हिंसक वळण लागले असून आंदोलकांनी पाच बसेसवर दगडफेक केली आहे. यात बसेसचे मोठे नुकसान झाले आहे.

---

निष्ठेने लढणार, स्वाभिमानाने जिंकणार

# पाली सर्कल मधून अर्चना देवगुडे यांचा जिल्हा परिषदेत विजयाचा निर्धार

बीड , (दिव्य न्युज):- नुकतेच जाहीर झालेल्या बीड जिल्हा परिषद निवडणुकीच्या आरक्षणात पाली सर्कल हे सर्वसाधारण महिलांसाठी खुले झाले आहे. या पार्श्वभूमीवर अनेक वर्षांपासून समाजकारण आणि स्थानिक राजकारणात सक्रिय भूमिका निभावणाऱ्या अर्चना नवनाथ देवगुडे यांनी पाली जिल्हा परिषद सर्कलमधून निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. निष्ठेने लढणार, स्वाभिमानाने जिंकणार आणि लढेंगे और जितेंगे भी... या टॅगलाईनसह



देवगुडे यांनी निवडणुकीच्या रणांगणात उतरण्याची तयारी केली आहे. स्थानिक पातळीवर त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे आणि लोकसंपर्कामुळे त्यांना चांगला जनाधार मिळाल्याचे बोलले जात आहे. आगामी निवडणुकीत पाली सर्कलमधील ही लढत विशेष लक्षवेधी ठरणार असून, अर्चना देवगुडे यांच्या उमेदवारीकडे. जनतेतून मोठ्या प्रमाणे मागणी होत आहे. राजकीय वर्तुळात उत्सुकतेने पाहिले जात आहे.

---

# पत्नी, सासरच्या छळाला कंटाळून जीवन संपवलं

गेवराई, (दिव्य न्युज):- सासरकडून होणाऱ्या छळाला कंटाळून एका तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन जीवन संपविल्याची हृदयद्रावक घटना गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीत उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

भागवत अंकुश राठोड (रा. गे- वराई तालुका) असे मृत तरुणाचे नाव असून, आत्महत्येच्या प्रकरणी त्याची पत्नी राणी राठोड, सासरा संतोष राठोड आणि मामेसासरा दत्ता राठोड या तिघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा तलवाडा पोलिसांत दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भागवत राठोड याचे वैवाहिक आयुष्य गेल्या काही महिन्यांपासून तणावात होते. पत्नी व सासरच्या मंडळींकडून ते सतत मानसिक छळ, ताणतणाव आणि अवहेलना सहन करत होते. या सततच्या त्रासामुळे ते नैराश्यात गेले होते. शेवटी १ ऑक्टोबर रोजी त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. घरच्यांनी त्यांना तातडीने रुग्णालयात नेले; परंतु तोपर्यंत उशीर झाला होता.



सुसाईड नोट लिहून ठेवली होती. यात त्यांनी आपल्या मानसिक वेदना, पत्नी व सासरच्या मंडळींनी दिलेला त्रास आणि जगण्याची उरलेली इच्छा संपल्याचे स्पष्ट शब्दात नमूद केले आहे. अवघ्या दोन महिन्यांतच सासरचे मंडळी त्यांचा अतोनात छळ करत असल्याचे त्यांनी यात म्हटले आहे. लग्नानंतर अवघ्या दोनच महिन्यांत त्यांनी या त्रासाचा शेवट केला. दरम्यान ही चिठ्ठी पोलिसांच्या ताब्यात असून, तिच्या आधारे पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. या नोटमधील मजकूर वाचून नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

माझा मुलगा निर्दोष होता घटनेनंतर काही दिवस मानसिक धक्क्यात असलेल्या भागवतच्या आई सुनिता राठोड यांनी अखेर धैर्य एकवटून तलवाडा पोलिस ठाण्यात अकरा ऑक्टोबर रोजी पोलिसांत तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिघांविरुद्ध कलम ३०६ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा नोंदविला असून त्याचा तपास सुरू असून आरोपींना लवकरच अटक केली जाईल, असा तपास अधिकारी यांनी विश्वास दिला आहे.

---

पान ४ वरून

## लोकशाहीच्या

जनतेतील समर्थक एकजूट होऊन कामाला लागले असून, यावेळी नगराध्यक्ष हा एमआयएमचाच होणार असा नारा देत पक्ष संघटन सज्ज होत आहे.एम आय एम चे कार्यकर्त्यांमध्ये सध्या उत्साहाचे वातावरण असून, धारूर नगरपरिषदेत पाहिलांदा एम आय एम चा झेंडा फडकवण्याचा संकल्प करण्यात आला आहे, असे एम आय एम चे माजलगाव मतदारसंघ प्रभारी सिद्दीक भैय्या शेख यांनी सांगितले ?

## एमबीडब्ल्युडब्ल्यु तर्फे

कमीत खर्चात आकर्षक आकाशकंदील बनवायचा आहे आणि पणती डेकोरेशन करायच आहे हाच स्पर्धेतील निवडीचा निकष असणार आहे. बालवयातच सामाजिक जाणीव निंमाण व्हावी यासाठी २५ रुपये अशी नाममात्र प्रवेश फी ठेवली असुन या फीस मधुन जमा झालेल्या रक्कमेतुन गरजु बालकांची दिवाळी गोड व्हावी म्हणून दिवाळी भेट देण्यात येणार आहे.

तरी बीड शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजन समिती तर्फे करण्यात आले आहे.

## बांधकाम कामगार

राबवल्या जात आहेत. पण याची फळ कामगारांना कमी आणि बोगस लाभार्थ्यांना जास्त मिळत आहे. कामगार कल्याण अधिकाऱ्यानी कॉन्ट्रॅक्ट बेस वर कर्मचार नेमणूक कोणत्या नियमाखाली केली आहे का फक्त वसुलीसाठी असा देखील प्रश्न पडत आहे. कल्याणकारी योजनांचा फायदा बांधकाम मजुरांना होण्याऐवजी एजंटासह समन्वयकलाच जास्त होत असल्याचं दिसत आहे. त्या नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यास तुटपुंजी वेतन मिळत असताना कोट्यावधी रुपयांचे बंगले बांधकाम कामगारांचं शोषण करून उभा केल आहे. यांने जमवलेल्या मायेचा स्त्रोत हा गुढ आहे. ही माया गोळा करताना अनेक ग्रामपंचायतींचे बनावट सही शिक्के तयार करून घेतले गेले. या सही शिक्यांचा भरमसाठ वापर करत बनावट कागदपत्र तयार केली. यामध्ये शेकडो लोक बांधकाम मजुरांना मिळणाऱ्या योजनांचा बोगस लाभ घेत आहेत. धन दांडग्यांच्या घरात देखील कामगारांना वाटप केलेल्या भांड्याचे किट या माध्यमातून गेले. खरा गरजवंत बांधकाम कामगार मात्र यांच्या या काळ्या कारणाम्यामूळे योजना पासून कोसो दूर राहू लागला आहे. तीच स्थिती सध्या कामगारांच्या सुरू असलेल्या प्रशिक्षणाची आहे. फोटो काढायचं प्रशिक्षण दिले हे दाखवायचं. त्यातून मिळणारं ५ हजार रुपयाच अनुदान खिशात घालायचं. यामध्ये देखील सगळाच बोगस प्रकार सध्या तरी घडत आहे.

## जगताप कुटुंबाच्या

तब्येतीची काळजी करत होते. अरूण जगताप आणि संग्राम जगताप यांचंही मुस्लीम समाजाशी नातं चांगलं होतं. मात्र, २०२४ च्या निवडणुकीनंतर त्यांनी हिंदुत्ववादी अजेंडा घेतला आहे, असं लंके नमूद करतात. जगताप कुटुंबाच्या राजकीय वाटचालीवर बोलताना भैरवनाथ वाकळे सांगतात, संग्राम जगताप यांचे वडील अरूण जगताप यांच्या राजकीय काळात अनिल राठोड हिंदुत्ववादी नेते होते, तर दुसरीकडे स्वतः अरूण जगताप धर्मनिरपेक्ष राजकारण करायचे. त्यामुळे त्यांना सुरुवातीपासून मुस्लीम समुदायाकडून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. त्या बळावर ते मोठे झाले.

## ज्यांच्या वादग्रस्त

संग्राम जगतापांच्या भूमिकेला पक्षातूनच विरोध

संग्राम जगताप यांच्या या भूमिकेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार इंद्रीस नायकवाडी म्हणाले, आम्ही त्यांना स्पष्टपणे सांगितलं आहे की, जर त्यांना आमची विचारधारा पटत नसेल, तर त्यांनी राजीनामा द्यावा. त्यांनी राजीनामा दिला नाही, तर त्यांच्यावर योग्य कारवाई करायला आणि त्यांना कसं मोकळं करायचं यासाठी माझा पक्ष आणि माझे नेते समर्थ आहेत. त्यांनी पक्षापासून दूर झालं पाहिजे. कारण ते आमच्या पक्षाच्या चिन्हावर निवडून आले आहेत. ते दूर होत नसतील, तर त्यासाठी काय कार्यवाही करायची असते हे आमचे वरिष्ठ जाणून आहेत, असं मत नायकवाडी यांनी व्यक्त केलं.

---

पान १ वरून

## संग्राम जगतापांना मुंबईत

आली. फारूक पटेल सह इतरांच्या या मागणीमुळे अजित पवारांनी तात्काळ दखल घेत संग्राम जगताप यांना मुंबईत बोलावून चांगलेच कान टोचल्याची चर्चा सुत्रांकडून मिळाली आहे. फारूक पटेल सह त्यांच्या टिमचे सर्वस्तरातून कौतूक होत असून बीड शहर पोलीस ठाण्यात देण्यात आलेल्या तक्रारीमध्ये मोईन मास्टर, फारूक पटेल, आश्पाक इनामदार, भागवत तावरे, महेश धांडे, संदिप पाटील, बरकत पठाण, मुसा खान, अलिम पटेल, समिर शेख, रितेश ढगे, खालेद फारूकी सह इतर जणांची उपस्थिती होती.

## संग्राम जगतापच्या बेताल

सुमोटो कारवाई देखील करू शकते असेही शफीकभाऊंनी सांगितले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कायदा हा सर्वस्व असून या कायद्याने प्रत्येकाला समान अधिकार दिलेले आहेत. संग्राम जगताप दोन समाजामध्ये तेढ निर्माण

करून सातत्याने बेताल वक्तव्य करत आहेत. याबाबत कोणकोणत्या कलमाच्या आधारे कारवाई करता येऊ शकते याची सर्व लेखी आणि पुराव्यानिशी माहिती शफीकभाऊंनी पोलीस प्रशासनाकडे सादर केली आहे. त्यामध्ये संबंधित तरतूदः अशा भाषणामुळे स्पष्टपणे इछड कलम २९९ अंतर्गत जबाबदारी येते - कोणत्याही वर्गाच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धेचा अपमान करून त्यांच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून आणि द्वेषपूर्ण कृत्ये. ३. मुस्लिम दुकानदारांवर आर्थिक बहिष्कार घालण्यास अलीकडील चिथावणी अलीकडेच. श्री संग्राम जगताप यांनी येत्या दिवाळी सणादरम्यान मुस्लिम दुकानदारांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन करणारे सार्वजनिक विधान केले, मुस्लिमांच्या मालकीच्या आस्थापनांमधून वस्तू खरेदी करू नयेत असे आवाहन केले. गुन्ह्याचे स्वरूप: हे विधान थेट धर्मावर आधारित आर्थिक आणि सामाजिक भेदभावाला प्रोत्साहन देते आणि सांप्रदायिक फूट पाडण्याचा हेतू आहे. हे भारतीय न्याय संहिता, २०२३ (इछड) अंतर्गत स्पष्ट गुन्हे आहे: कलम १९६: धार्मिक आधारावर गटांमध्ये शत्रुत्व वाढवणे,कलम २३०(२): वर्गांमध्ये द्वेष किंवा द्वेषभावना वाढवणे.,कलम ५०५(२): समुदायांमध्ये शत्रुत्व किंवा द्वेष वाढवून सार्वजनिक त्रासाला चालना देणारी विधाने.,कलम ५०५(२): समुदायांमध्ये शत्रुत्व किंवा द्वेष पसरवून सार्वजनिक दंगलीला चालना देणारी विधाने.,अशा वक्तव्यांमुळे बीडमधील नाजूक सांप्रदायिक संतुलन धोक्यात येते आणि सार्वजनिक सुव्यवस्थेला कोणताही अडथळा येऊ नये म्हणून त्वरित प्रतिबंधात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली जाते.,४. सर्वोच्च न्यायालयाचा बंधनकारक आदेश,रिट याचिका (दिवाणी) क्रमांक ९४३/ २०२१ (अँशिनी कुमार उपाध्याय विरुद्ध भारतीय संघ आणि इतर) मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांमुळे सक्रियपणे कार्य करण्याचे तुमचे कार्यालयाचे कर्तव्य अधिक दृढ होते.,२८.०४.२०२३ रोजीच्या त्यांच्या कार्यवाहीच्या नोंदीमध्ये, माननीय न्यायालयाने सर्व पोलिस अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत... कलम १५३-अ, १५३-८, २९५-अ, ५०५ इत्यादी गुन्ह्यांना आकर्षित करणारे कोणतेही भाषण किंवा कोणतीही कृती घडल्यास, तक्रार आली नसली तरीही स्वतःहून गुन्हे नोंदवून कायद्यानुसार कारवाई केली जाईल याची खात्री करावी आणि गुन्हेगारांविरुद्ध कारवाई करावी.,या स्पष्ट न्यायालयीन निर्देशांना न जुमानता या रॅलीला पुढे जाण्याची परवानगी देणे कायदेशीर कर्तव्यात अपयश ठरेल आणि त्याचे पालन न केल्याबद्दल अवमान कारवाईला आमंत्रित केले जाऊ शकते.,५. तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाईची विनंती,सार्वजनिक शांतता आणि सांप्रदायिक सौहार्दाला येणारा धोका लक्षात घेता. मी अत्यंत आदरपूर्वक आग्रह करतो की:,१. प्रस्तावित रॅली/सभेची परवानगी त्वरित नाकारण्यात यावी किंवा रद्द करण्यात यावी;,२. सीआरपीसीच्या कलम १४९- १५१ अंतर्गत प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू कराव्यात:,३. सदर व्यक्तीच्या कोणत्याही सार्वजनिक विधानांचे निरीक्षण आणि रेकॉर्डिंग सुनिश्चित करावे; आणि,४. १४ ऑक्टोबर २०२५ पूर्वी केलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईची लेखी पुष्टी द्यावी.,जर या रॅलीमुळे कोणतेही द्वेषपूर्ण भाषण, हिंसाचार किंवा गोंधळ निर्माण झाला, तर मला योग्य निर्देश मिळविण्यासाठी आणि निष्क्रियतेसाठी संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध अवमान कारवाई सुरू करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्यास भाग पाडले जाईल. या विविध कलमाच्या माध्यमातून पोलीस प्रशासन जगतापवर कारवाई करू शकते असेही शफीकभाऊंनी म्हटले आहे. संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध अवमान कारवाई सुरू करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्यास भाग पाडले जाईल. या विविध कलमाच्या माध्यमातून पोलीस प्रशासन जगतापवर कारवाई करू शकते असेही शफीकभाऊंनी म्हटले आहे.

## पालकमंत्री अजित

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेत अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर करत विविध मागण्यांचे पत्र दिले. यामध्ये भूस्खलनाच्या धोक्यामुळे कपिलधारवाडी येथे माळीण गावासारखी दुर्घटना होण्याची शक्यता असून या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी केली. तसेच अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झालेल्या आणि पुढील काळात देखील संभाव्य धोका असलेल्या हिंगणी खुर्द गावाचे स्थलांतर करण्याची मागणी देखील आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.याव्यतिरिक्त बीड मतदार संघातील रस्ते व पूल वाहून गेल्यामुळे नागरिकांना ये जा करण्यास मोठी अडचण येत आहे. अनेक गावांचे संपर्क तुटल्याने हे रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करण्यात यावे तसेच काही ठिकाणी नवीन रस्ते आणि पूल करण्यात यावे. यासह सार्वजनिक मालमत्तेचे झालेल्या नुकसानीचा अहवाल अजित पवारांना सुपूर्द करून तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली.

## सत्तर वर्षात झालं

वक्फ बोर्डाने शेतकऱ्यांप्रती दाखवलेली माणूसकी अधोरेखित होत आहे. वक्फ बोर्डाच्या वतीने समीर काझी यांनी काही दिवसांपुर्वीच बीडमधील पुरग्रस्तांना वैयक्तीक स्वरूपाची मदत केलेली आहे. त्यानंतर सीएम रिलीफ फंडसाठी दिलेली मदत उल्लेखनीय ठरत आहे. दरम्यान वक्फ बोर्डाचे सदस्य, अध्यक्ष म्हणून ना.समीर काझी यांनी राज्य वक्फ बोर्डाला विकासाचा लुक दिला आहे. गेल्या काही वर्षात त्यांनी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड अधिक सक्षम झाले आहे.